**प्रेसनोट दि. ०३.०८.२०२१**

श्री. खंडु ज्ञानदेव निकम वय ६० वर्ष सेवानिवृत्त लिपीक तहसिलदार कार्यालय तासगांव रा. चिंचणी ता. तासगांव जि. सांगली ५०००/- रूपये लाच मागणी करून श्री.गणेश हणमंत पाटील, वय ३० वर्ष रा. चिंचणी ता. तासगांव जि. सांगली (खाजगी इसम) यांचे करवी लाच स्विकारले बाबत कारवाई सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांचे मुरूम वाहतूकीचा ट्रॅक्टरवर तहसिलदार तासगांव यांनी कारवाई केली होती. सदरचा ट्रॅक्टर सोडण्याबाबत आदेश होण्यासंदर्भातील कागदपत्रे वरिष्ठ कार्यालयास पाठवण्यासाठी तहसलिदार कार्यालय तासगांव येथील लिपीक श्री. निकम यांनी तक्रारदार यांचेकडे ५०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.०३.०८.२०२१ रोजी दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आज दिनांक ०३.०८.२०२१ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये तक्रारदार यांचा ट्रॅक्टर सोडण्याबाबत आदेश होण्यासंदर्भातील कागदपत्रे वरिष्ठ कार्यालयास पाठवण्यासाठी लिपीक श्री. निकम यांनी तक्रारदार यांचेकडे ५०००/- रूपये लाच मागणी करून लाच रक्कम श्रध्दा स्वीट मार्ट या ठिकाणी या ठिकाणी असले खाजगी इसमाकडे देण्यास सांगीतल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यानंतर लागलीच श्रध्दा स्वीट मार्ट या ठिकाणी सापळा लावला असता श्री. निकम यांचे सांगणे वरून श्री.गणेश हणमंत पाटील, वय ३० वर्ष रा. चिंचणी ता. तासगांव जि. सांगली (खाजगी इसम) यांनी तक्रारदार यांचेकडून ५०००/- रूपये स्विकारलेनंतर त्यांना पकडण्यात आले असून श्री. खंडु ज्ञानदेव निकम वय ६० वर्ष सेवानिवृत्त लिपीक तहसिलदार कार्यालय तासगांव रा. चिंचणी ता. तासगांव जि. सांगली यांना तहसिलदार कार्यालय तासगांव येथून ताब्यात घेतले आहे.

श्री. खंडु ज्ञानदेव निकम यांनी तक्रारदार यांना लोकसेवक असल्याचे भासवून त्यांचेकडे लाचेची मागणी करून खाजगी इसमा करवी लाच स्विकारलेचे निष्पन्न झाल्याने त्या अनुषंगाने श्री. खंडु ज्ञानदेव निकम वय ६० वर्ष सेवानिवृत्त लिपीक तहसिलदार कार्यालय तासगांव रा. चिंचणी ता. तासगांव जि. सांगली व श्री.गणेश हणमंत पाटील, वय ३० वर्ष रा. चिंचणी ता. तासगांव जि. सांगली (खाजगी इसम) यांचे विरुध्द तासगांव पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुरज गुरव श्री. अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, सुहास नाडगौडा सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, श्री. गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार अविनाश सागर, सलिम मकानदार, राधिका माने, भास्कर भोरे, संजय संकपाळ, प्रितम चौगुले, धनंजय खाडे, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सत्यमेव जयते

(Sujay Ghatge)
**Dy. Supdt. of Police**
**Anti Corruption Bureau, Sangli.**

Scanned with CamScanner